तात्काळ.

क्र.माध्य-३/(१४)नमाशा/मान्यता/पुवि/९१.९२
शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे-१ यांचे
कार्यालय,
दि. 6 SEP 1991

प्रति,
सचिव,
शिवभूमी शिक्षण मंडळ,
खेड शिवापूर, ता. भोर, → हवेली
जि. पुणे.

विषय :- सन. १९९१-९२ या शै.वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- मा.उपसचिव,शिक्षण व सेवायोजन विभाग,यांचेकडील पत्र क्र.एसएसएन/१०९१/२७६४/माशि-१ दि. २४ ऑगस्ट ९१ चे पत्र.

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खाली दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९१ पासून विना-अनुदान तत्वावर /कायम विना अनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नविन माध्यमिक शाळा,माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यांत येत आहे.

(१) या नविन माध्यमिक शाळांना ( इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त ) शासन निर्णय,शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.एसएसएन १०८८/१६६९-एन/माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नविन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

(२) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे ( उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशा बाबत इ.) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(३) सदर संस्थाची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

२..

[४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी.च्या] फी च्या परताबाव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.

[५] जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यांतून यात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यांत यावेत तसेच प्रवेशा वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

[६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन-फीज] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

[७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

[८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल.

[९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी[माध्यमिक] यांचेकडून मंजूर करून घेण्यांत येईल.

[१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

[११] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

[१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा.शिक्षण-संचालक यांची पूर्व परवानगी, शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी :-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमा खाली नोंदणी आवश्यक आहे.

२] संस्थे विरुद्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

त्या बाबी पैकी एक जरी बाब वरील संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रदद झाल्याचे समजण्यात येईल.

| अनु. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | **शिवभूमि शिक्षण मंडळ, खेड शिवापूर.** | **यमुनानगर, निगडी.** | **८वी जून ९१ पासून.** | **मराठी** |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित पत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थानां मान्यता देण्याची पध्दती मधील नियम २८ मधील १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमा प्रमाणे व पत्रात अर्ज करावा.

**स्थळ प्रतीवर मा. शि. उ. सं.**
**यांची सही असे**

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रतिलिपी.

१ शिक्षणाधिकारी[माध्य] जिल्हा परिषद पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित त्यांनी वरील नविन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थे विरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नविन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्याकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

३] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहितीस्तव सादर.

यशवंतराव चव्हाण भुवन,
जिल्हा परिषद, पुणे.
जा.क्र.जि.प/माध्य./वि.अ./जात/९५/९६
दिनांक. २८.१२.१९९५. पुणे.

**BOOK-POST**

प्रती,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
शिवगुंज विद्यालय थेऊरगाव
भिगवडी पुणे ४४

विषय – विनाअनुदानीत शाळेतील विनाअनुदानीत जादा तुकड्या मान्यतेबाबत सन ९५–९६.

संदर्भ – मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे.१ हयाचे जा.क्र. माध्य–२/वि.अ./जादा तुकड्या पुवि ९५ दि.२७.१२.१९९५.

उपरोक्त संदर्भिय विषयांनुसार खालील विनाअनुदानीत शाळांना विनाअनुदानीत जादा तुकड्या मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

खालील शाळांना कळविण्यात येते की, मंजूर केलेल्या तुकडीची विद्यार्थी संख्या टिकवून ठेवणे बाबत आदेश देण्यात येत असून, मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे १, हयांचे कडून विद्यार्थी संख्या तपासणी अचानकपणे करण्यात येईल, जर तपासणी मध्ये विद्यार्थी संख्या कमी झालेली दिसल्यास सदरच्या शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल हया अटीवर सोबतच्या तुकड्यात नमुद केलेल्या विनाअनुदानीत जादा तुकड्यांना सन ९५–९६ या शैक्षणिक वर्षापासून मान्यता देण्यात आली आहे, हयांची संबंधीत शाळांनी नोंद घ्यावी.

स्थळप्रतीवर मा. शि. अ. यांची
सही असे

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे.

प्रत – अधिक्षक, वेतन पथक, पुणे.१ हयांना पुढील कार्यवाहीसाठी...
प्रत – मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे,१
प्रत – मा. शिक्षण संचालक, म.रा. पुणे.१.

| अ.क्र. | शाळेचे नांव | विद्यार्थी संख्या | निर्णय मान्य तुकड्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०१. | तुकाराम धो. पठारे विद्यालय, खराडी, चंदननगर, पुणे. १४. | २१६ | इ.८वी ची ४थी मान्य. |
| | | १६४ | इ.९वी ची ३री मान्य. |
| | | १०८ | इ.१०वी २री मान्य. |
| ०२. | यशवंतराव चव्हाण विद्यालय, बिबवेवाडी, पुणे. ३७. | ४७७ | इ.८वीची ७वी मान्य. |
| | | ३४५ | इ.९वी ची ५वी मान्य. |
| ०३. | प्रतिभाताई पवार माध्यमिक विद्या. कोंढवा बु।।, ता. हवेली. | ७४ | इ.५वी ची २री मान्य. |
| | | ८१ | इ.६वी ची २री मान्य. |
| | | ६४ | इ.८वी ची २री मान्य. |
| | | ६० | इ.९वी ची २री मान्य. |
| ०४. | लोणावळा नगरपरिषद, लोणावळा. | १०३ | इ.८वी ची २री मान्य. |
| ०५. | वि.म. विद्याकुंज, वारजे. | ६४ | इ.८वी ची २री मान्य. |
| ०६. | सिम्बॉयसिस सेकंडरी स्कूल, पुणे. | १०० | इ.८वी ची २री मान्य. |
| | | १०० | इ.९वी ची २री मान्य. |
| ०७. | डॉ.वसंतदादा पाटील विद्यालय, शुक्रवार पेठ, पुणे.२. | १११ | इ.९वी ची २री मान्य. |
| | | ४६ | इ.१०वीची १ली मान्य. |
| ०८. | सेंट उर्सुला हायस्कूल, आकुर्डी, पुणे. ३५. | २३८ | इ.८वी ची ४थी मान्य. |
| | | २३३ | इ.९वी ची ४थी मान्य. |
| | | २२६ | इ.१०वीची ४थी मान्य. |
| ०९. | विकास माध्यमिक विद्यालय, मोरवाडी रोड, चिंचवड. | ९५ | इ.९वी ची २री मान्य. |
| १०. | विद्याविकास विद्यालय, ५ सहकारनगर नं.१. | १०८ | इ.४वी ची २री मान्य. |
| ११. | महात्मा फुले विद्यालय, वरकुटे खुर्द, ता.इंदापूर. | ८२ | इ.५वी ची २री मान्य. |
| १२. | विद्या प्रतिष्ठानची मराठी माध्य. हायस्कूल, एमआयडीसी.बारामती. | १५६ | इ.५वी ची २री मान्य. |
| | | ११२ | इ.६वी ची २री मान्य. |
| | | १३१ | इ.७वी ची २री मान्य. |
| | | १२३ | इ.८वे ची २री मान्य. |
| १३. | आपटी माध्यमिक विद्यालय, ता.भोर | ९८ | इ.८वी ची २री मान्य. |
| १४. | इंग्लिश मिडियम सेकंडरी स्कूल, पुणे. ३०. | ९४ | इ.८वी ची २री मान्य. |
| | | ९४ | इ.९वी ची २री मान्य. |
| १५. | श्री.विद्या.प्रशाला, मळवली, ता.मावळ | ११३ | इ.८वी ची २री मान्य. |
| १६. | शिवभूमी विद्यालय, यमुनानगर, निगडी पुणे. ४४. | ११९ | इ.८वी ची २री मान्य. |
| | | १२१ | इ.९वे ची २री मान्य. |
| १७. | उर्दू माध्य. विद्यालय, येरवडा, पुणे. ६ | १०८ | इ.८वी ची २री मान्य. |
| १८. | श्री.बाबीर विद्या. रुई, पो. न्हावी. ता.इंदापूर. | ८७ | इ.८वी ची २री मान्य. |
| १९. | संस्कृत विद्यामंदिर, पुणे. | १०८ | इ.८वी ची २री मान्य. |

..३..

विना अनुदानित माध्यमिक शाळेतील विना अनुदानीत जादा तुकड्या मान्य

| अ.क्र. | शाळेचे नांव | विद्यार्थी संख्या. | निर्णय मान्य जादा तुकडी. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २०. | माध्य. विद्यालय, वारजे, ता. हवेली. | १०१ | इ.५वी चा २री मान्य. |
| | | ९५ | इ.६ वी ची २री मान्य. |
| | | ९६ | इ.७वी ची २री मान्य. |
| २१. | श्री.भानोबा विद्या.कुसेगांव, ता.दौंड | १०२ | इ.५वी ची २री मान्य. |
| | | ९७ | इ.६वी ची १ली मान्य. |
| २२. | माध्यमिक विद्यालय, बावधन, खुर्द, ता.मुळशी. | ८६ | इ.८वी ची २री मान्य. |
| २३. | श्री.छत्रपती हाय.काटेवाडी ता.बारामती. | १०९ | इ.८वी ची २री मान्य. |
| २४. | शारदाबाई पवार विद्यानिकेतन शारदानगर, ता.बारामती. | ९० | इ.५वी ची २री मान्य. |
| २५. | द.गुड सॅमॅरिटन स्कूल, वाकड, पुणे.२७. | ९० | इ.८वी ची २री मान्य. |
| २६. | न्यू.इंग्लिश स्कूल, पांढर वस्ती, चोपडज, ता.बारामती. | ८३ | इ.५वी ची २री मान्य. |
| | | ८२ | इ.७वी ची २री मान्य. |
| | | ८४ | इ.८वी ची २री मान्य. |
| २७. | संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय, पौड | १७४ | इ.५वी चा २री व ३री मान्य. |
| | | १७७ | इ.६वी ची २व३री मान्य. |
| | | १६० | इ.७वी २रीव३री मान्य. |
| | | १६३ | इ.८वी २रीव३री मान्य. |
| | | १२१ | इ.९वी ची २री मान्य. |
| | | ८८ | इ.१०वीची २री मान्य. |
| २८. | लोकमान्य टिळक हाय.खडकी. | २४८ | इ.७वी चा १ली, २री, ३री व४थी मान्य, एकूण, ४तुकड्या |

एकूण ६० विना अनुदानीत तुकड्या मान्य.

आ.क्र. ६७/८/९८
२५/११/९८

(५)

जा.क्र. माध्य-३/९३/मा/९८-९९/पुवि/९८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 19 NOV 1998

प्रति,

मुख्याध्यापक,

शिवभूमि विद्यालय, यमुनानगर
निगडी.

विषय :- अशासकिय अनुदानित माध्यमिक शाळेतील जादा मंजूर केलेल्या तुकड्यांबाबत...
सन १९९८-९९

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, सन ९८-९९ या शैक्षणिक वर्षात आपल्या शाळेची पट पडताळणी केली असता इयत्ता 10वी या वर्गाच्या 2री जादा तुकडीस मंजुरी देण्यात येत आहे. तसे आदेश शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद पुणे यांना अलाहिदा देण्यात आलेले आहेत. तरी, आपण शिक्षण अधिकारी यांच्याशी हे पत्र मिळाले पासून चार दिवसांच्या आत संपर्क साधावा. आपल्या शाळेचा शिक्षक/शिक्षकेतर संच सुधारित रित्या मंजूर करुन घ्यावा. या तुकड्यावर नवीन शिक्षक नेमण्यात येवू नयेत. खात्याकडून अतिरिक्त शिक्षक पाठविण्यात येईल. सदर शिक्षकास हजर करुन घेणे बंधनकारक आहे. नवीन शिक्षक नेमण्यापूर्वी शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद पुणे यांची मान्यता घेऊनच नेमणूक करावी. याबाबत आपल्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचेशी संपर्क साधून सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणावी.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

सत्यप्रतिवर शि. उ. सं. यांची
सही आहे

Received
25/11/98
H.M.

आव्क ६३।८।९९
२५।१।९८

फोन नं. ६३७७४१.

" यशवंतराव चव्हाण भवन "
पुणे जिल्हा परिषद पुणे. ⑤
जा. क्रं. शिक्षण माध्य. नवीन नैसर्गिक/जादा/तुकडया
गुंजरी ९८. ९९ ------ दिनांक २१. ११. ९८.
१८१०

बुक पोष्ट

प्रती,
मुख्याधापक/ मुख्याध्यापिका
जिजामाता विद्या प्रबोधिनी ---- निगडी ---- ता. -------जि. पुणे
पुणे शहर पिन नं. --------------

विषय :- नविन तुकडया मान्यता नंतर करावयांच्या सेवक निश्चिती बाबत.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कडील पत्र जा. क्रं. मान्य. जातु. पुवि. ९८ दिनांक १९. ११. ९८.

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस कळविणेत येते की, शैक्षणिक वर्षे सन ९८-९९ मध्ये विद्यार्थी संख्या वाढीमुळे आपल्या शाळेतील खालील दर्शविले-ल्या प्रमाणे तुकडी मान्य करण्यांत आली आहे.

| इयत्ता | पट संख्या | शहरी ग्रामीण | सध्या मंजुर तुकडया | जादा तुकडी मागणी | जादा तुकडीतील नि. स. | प्रत्येक तुकडी तीलअधिक वि: प्रमाणे | नैसर्गिक/जादा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ वी | | | | | | | |
| ९ वी | | | | | | | |
| १० वी | १३१ | श. | १ | २री | ५१ | ५१ | नैसर्गिक |

सदरची तुकडी / तुकडया वाढल्याने निर्माण होणा-या पदाबाबत सेवक निश्चिती करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी जिल्ह्यातील ज्या शाळांना नवीन तुकडया मंजुर करण्यांत आलेल्या आहे. त्या शाळांची सेवक निश्चीती शिबीर वेळापत्रकानुसार राहिल,

| विभाग | दिनांक | स्थळ | वेळ |
|---|---|---|---|
| १] पुणे शहर/पिंपरी चिंचवड मावळ, मुळशी, भोर, वेल्हे. | १. १२. ९८ | न्यु इंग्लिश स्कुल रमणबाग पुणे ३० | ११. ०० ते ५. ३० |
| २] खेड, जुन्नर, आंबेगाव, शिरुर | २. १२. ९८ | --"--"--"----"- | --"- |
| ३] दौंड, बारामती, इंदापुर हवेली, पुरंदर | ३. १२. ९८ | --"--"--"------ | --"-- |

या कार्यालयाचे पत्र जा. क्रं. माध्य. सेनिमा. ९७. ९८ दिनांक १७. ७. ९८ व सन ९८. ९९ अन्वेय सेवक निश्चीती साठी आवश्यक असणा-या कागदपत्रासह सेवक निश्चतीचा प्रस्ताव मुख्याधापकाने स्वता: मान्यतेसाठी वरील वेळापत्रका प्रमाणे मान्य करुन घ्यावा. सदर शिबिरांत उपस्थित न राहिल्यास सेवक निश्चिती व वैयक्तिक मान्यता या कार्या-लयाकडुन केली जाणार नाही. यांची कृपया नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत मा. शि. अ. जि. प. पुणे यांची सही असे

Seen
28/11/98
H.M.

शिक्षणाधिकारी [ माध्य. ]
पुणे जिल्हा परिषद पुणे.

आ.क्र ७८/९२/९३
२३/११/९२

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्य)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/९२.९३.
पुणे, दि. ५/११/९२

BOOK-POST



प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
शिवश्री विद्यालय, यमुनानगर, निगडी.
पुणे ४४.

विषय :- इ. १० वी वर्गास नैसर्गिक वाढीने मान्यता.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे यांचे-
कडील पत्र क्र. माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे ९२
दि. २८.९.९२.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या माध्यमिक विद्यालयातील इ. १० वी च्या वर्गास जून ९२ पासून खाली दर्शविलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर मान्यता देणेत येत आहे.

१) संस्थेने मालकीची शै.दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२) मुख्याध्यापकपदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३) स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन द्यावी.
४) स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी ग्रंथांची भर घालावी.
५) पुरेसे फर्निचर व शै. साहित्य उपलब्ध करुन द्यावी.
६) पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावी.
७) स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८) वाढीव फीचे दर मा.शि. संचालक, म.रा. पुणे यांचेकडून मंजूर करुन द्यावेत.
९) शालेय रेकॉर्ड माध्य.शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०) कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११) शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२) विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३) खेळाचे साहित्य खरेदी करावे.
१४) खेळाचे मैदान असावे.
१५) शालेय समिती स्थापन करावी.
१६) निरनिराळ्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.
१७) पुरेशी विद्यार्थी संख्या वाढवावी.

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे.

प्रत,
मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांना
माहितीस्तव सादर.

आवक / जावक नं.- २२०-०७-०८
दिनांक ४/१०/०७

पुणे जिल्हा परिषद
... राव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (माध्यमिक)
का. क्र. शिक्षण/माध्य/ [illegible] / [illegible] 2007
पुणे दि 2/10/2007

प्रति,
मुख्याध्यापक,
शिवभूमी (माध्यमिक)विद्यालय
यमुनानगर,निगडी,पुणे-४४

विषयः-इ१० वी वर्गाच्या एका तुकडीस (नैसर्गिक वाढीने असलेल्या) से.मी.इंग्रजीसाठी मान्यता मिळणेबाबत (२००७-२००८)
संदर्भः-मा.शिक्षण उपसंचालक,यांचे कडील पत्र कमांक /३१३/से.मी.ई/ २१४९१/९४/२००४ दि.०५/१०/२००५

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार आपणास कळविण्यांत येते की,आपल्या प्रशालेतील इ.१० वीच्या (नैसर्गिक वाढीने असलेल्या) सन २००७-२००८ या वर्षास से.मी.इंग्रजी माध्यमासाठी खालील प्रमाणे अटीस अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१.सदर विषय शिकविण्यास जादा तुकडी व कर्मचारी खात्याकडून मंजुर केली जाणार नाही.
२.सदर वर्गासाठी जादा अनुदान मंजुर केले जाणार नाही.
३.शैक्षणिक साहित्य शिक्षकांच्या भौतिक सुविधा पुरेसे विद्यार्थी संस्थेने शाळेने उपलब्ध करुन देणाच्या अटीवर सदर परवानगी चालू राहील.
४.संस्थेस जादा फी आकारता येणार नाही.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जि. प., पुणे

Received
[illegible]
4/10/2007
H.M.

पुणे जिल्हा परिषद
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा. क्र./शिक्षण/माध्य/ ८-११/ मा.शि.क्ष/२००६
पुणे दि. ७/१२/२००६

प्रति,
मुख्याध्यापक,
शिलभूमी (माध्यमिक) विद्यालय,
यमुनानगर निगडी पुणे ४४

**विषय :-** इ. ९ वी इयत्तेच्या वर्गाच्या एका तुकडीस (नैसर्गिक वाढीने असलेल्या) सेमी इंग्रजी माध्यमास मान्यता मिळणे बाबत (२००६-०७)

**संदर्भ :-** मा. शिक्षण उपसंचालक, यांचे कडील पत्र क्रमांक/३१९३/सेमी इं/२९४८१/९४/२००४ दि. ०५/१०/२००४

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या प्रशालेतील इ. ९ वी च्या वर्गास सन २००६-०७ या वर्षी (नैसर्गिक वाढीने असलेल्या) वर्गासाठी सेमी इंग्रजी साठी खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

〈१〉 सदर विषय शिकविण्यासाठी जादा तुकडी व कर्मचारी स्वतंत्र मंजूर केली जाणार नाही.
〈२〉 सदर वर्गासाठी अनुदान मंजूर केले जाणार नाही.
〈३〉 शैक्षणिक साहित्य शिक्षकांच्या भौतिक सुविधा पुरेसे विद्यार्थी संस्थेने शाळेने उपलब्ध करुन देण्याच्या अटीवर सदर परवानगी चालू राहील.
〈४〉 संस्थेस जादा फी आकारता येणार नाही.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जि. प., पुणे